# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २६.०३.२०२४

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २५/०३/२०२४ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५५ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४९,६००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणारे अंतर्गत दि. २५/०३/२०२४रोजी जुगार कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण २ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ४,१४,७३०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २५/०३/२०२४ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण २८ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ८३,९४०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या वाळुची चोरी करणाऱ्या विरुध कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये संयुक्त पथकाने केलेली कार्यवाही अवैधरित्या वाळुची चोरी करणाऱ्या विरुध दि. २५/०३/२०२४ रोजी एकुण ०१ ठिकाणी कलम ३७९भादवी सहकलम ४८(७)(८) गौ.ख.अधि अन्वये कार्यवाही करण्यात आली.

१) पोस्टे बाळापुर  हददीत मौजे जवळा पांचाळा शिवारात जवळा पाचांळ ते गुंडलवाडी रोडवर दक्षिणेस २५ किमी ओ.पी.डोंगरकडा या ठिकाणी यातील आरोपीने आपले ताब्यातील ज्याचेवर पासींग क्र.एम.एच.०६ बि.डी.०४९९ टिप्पर मध्ये अंदाजे २ ब्रास रेती गौण खनिज वाळु हि चोरून त्यांची जवळा पांचाळ ते गुंडलवाडी रोडवर वाहतुक करीत असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा.